


# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – चौथी (19 जुलै) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस एकोणीस :☞ CLICK HERE



गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.


## कविता ऐका व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ४. या भारतात...

कविता पहा

- ऐका. म्हणा. वाचा.



या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ, संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ॥ धृ. ॥

नांदोत सुखे गरीब, अमीर एकमतानी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
स्वातंत्र्य-सुखा या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ १ ॥

सकळांस कळो मानवता, राष्ट्रभावना ।
हो सर्व स्थळी मिळुनि समुदाय-प्रार्थना ।
उद्योगि तरुण वीर शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ॥ २ ॥

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ नष्ट हो जगातुनी ।
खळनिंदका-मनीहि सत्य न्याय वसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ३ ॥

सौंदर्य रमो घराघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेत कसू दे ।
दे वरचि असा दे ॥ ४ ॥

– राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज

शिक्षकांसाठी : विद्यार्थ्यांकडून ही कविता तालासुरात म्हणून घ्यावी.

## खालील संख्या सूचनेनुसार लिहा.

## २. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

**स्वाध्याय**

१. अक्षरी संख्या अंकांत लिहा.

(१) चाळीस हजार (२) पन्नास हजार पन्नास (३) बारा हजार तीनशे तेरा

(४) पंचेचाळीस हजार तीन (५) तेवीस हजार एकशे पाच (६) अडुसष्ट हजार पाच

२. संख्या वाचा व अक्षरांत लिहा.

(१) ५२,०४५ (२) २३,४०९ (३) ४५,६००

(४) ४१,००० (५) ९९,९९९ (६) ९५,७६८

३. सोबतच्या संख्यापाटीवर एकक, दशक, शतक, हजार, दशहजारस्थानचे अंक बदलून पाच संख्या लिहा व वाचा.

| दह | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| २ | ३ | ४ | १ | १ |

४. ९, ५, ६, १, ८ यांपैकी प्रत्येक अंक एकदाच वापरून पाच अंकी सहा संख्या लिहा.

५. १, ५, ६, ४, ७ हे अंक वापरून सर्वांत मोठी संख्या लिहा.

६. ४, ३, ९, ८, ७ हे अंक चढत्या क्रमाने आणि उतरत्या क्रमाने लिहून दोन संख्या लिहा.

७. ६, ०, ७, ५, ४ यांतील ७ हा अंक एककस्थानी घेऊन पाच संख्या तयार करा व लिहा.

८. ४, ९, ३, ५, १ यांपैकी सर्वांत लहान अंक एककस्थानी घेऊन पाच संख्या लिहा.

### संख्येचे विस्तारित रूप

हमीद : ५,३२४ ही संख्या बेरजेच्या रूपात किंवा विस्तारित रूपात मांडता येईल का ?

ताई : आपण तीन अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहायला शिकलो आहोत. त्याप्रमाणेच चार किंवा पाच अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहूया.

शरद : ५,३२४ म्हणजे ५ हजार, ३ शतक, २ दशक व ४ एकक.

मेरी : म्हणजे ५,३२४ चे विस्तारित रूप ५००० + ३०० + २० + ४ आहे.

ताई : याप्रमाणे २३,३७५ या पाच अंकी संख्येचे विस्तारित रूप लिहा.

शरद : २३,३७५ म्हणजे २ दह, ३ ह, ३ श, ७ द व ५ ए.

२३,३७५ चे विस्तारित रूप २०,००० + ३,००० + ३०० + ७० + ५

**स्वाध्याय**

१. खालील संख्या विस्तारित रूपात लिहा.

(१) ७,५४५ (२) ४,०५० (३) ६५,१०० (४) ८,००० (५) १२,७४५

(६) ७८,९९९ (७) ९,३९२ (८) ५०,१०५ (९) ७०,४९५ (१०) ८२,७२७

Write the following numbers as instructed. **2. Number Work**

**Exercise**

1. Read the numbers, write them in figures.
   (1) Forty thousand
   (2) Fifty thousand fifty
   (3) Twelve thousand, three hundred and thirteen
   (4) Forty-five thousand and three
   (5) Twenty-three thousand, one hundred and five
   (6) Sixty-eight thousand and five

2. Read the numbers, write them in words.
   (1) 52,045 (2) 23,409 (3) 45,600
   (4) 41,000 (5) 99,999 (6) 95,768

3. 

| TTh | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| 2 | 3 | 4 | 1 | 1 |

On the number slate alongside, write five numbers by changing the digits in the units, tens, hundreds, thousands and ten thousands places, one at a time. Read the numbers.

4. Using each of the digits 9, 5, 6, 1, 8 only once, write six five-digit numbers.

5. Write the biggest number that can be made using the digits 1, 5, 6, 4, 7 .

6. Write two numbers by writing the digits 4, 3, 9, 8, 7 in the ascending and descending order.

7. Keeping 7 in the units place, use all the digits 6, 0, 7, 5, 4 to make five numbers. Write the numbers.

8. Write five numbers, keeping the smallest of 4, 9, 3, 5, 1 in the units place.

## The expanded form of a number

**Hamid** : Could we write the number 5,324 as an addition or in the expanded form?

**Tai** : We have learnt to write the expanded form of a three-digit number. Let's write the expanded form of a four- or five-digit number in the same way.

**Sharad** : 5,324 means 5 thousands, three hundreds, 2 tens and 4 units.

**Mary** : It means that the expanded form of 5,324 is 5000 + 300 + 20 + 4.

**Tai** : Now, write the expanded form of the five-digit number 23,375.

**Sharad** : 23,375 means 2 TTh, 3 Th, 3 H, 7 T and 5 U. The expanded form is 23,375 = 20,000 + 3000 + 300 + 70 + 5.

**Exercise**

1. Write the following numbers in the expanded form.
   (1) 7,545 (2) 4,050 (3) 65,100 (4) 8,000 (5) 12,745
   (6) 78,999 (7) 9,392 (8) 50,105 (9) 70,495 (10) 82,727

टेस्ट सोडवा

## Listen and understand.   Revision

**Four Things about me**

**1. Listen and read aloud.**
ऐका आणि मोठ्याने वाचा.



I am Sakshi.
I am nine years old.
I am 130 centimetres tall.
I am in Standard Four.





I like rice.
I like tigers.
I like [........] channel.
I like running.

I have a red pen, two blue pencils, an orange sharpener and a white eraser.



I can draw a hut.
I can read a few English words.
I can sing a song.
I can swim.



Every day, I brush my teeth, take a bath, read for some time and play for some time.



**2. Now use the following frames to tell us about yourself.**
दिलेले नमुने वापरून आता स्वत:बद्दल बोला.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| I am .... | I like ....... | I have....... | I can........ | Every day, I ............... |
| .................. | ........... | ........... | ........... | ............... |
| .................. | ........... | ........... | ........... | ............... |
| .................. | ........... | ........... | ............. | ............... |



पाठ वाचा व स्वाध्याय सोडवा.

# २. सजीवांचे परस्परांशी नाते

टेस्ट सोडवा

## हे नेहमी लक्षात ठेवा

ऋतुचक्राप्रमाणे परिसरात बदल होतात त्या बदलांशी सजीवांना जुळवून घ्यावे लागते.

## स्वाध्याय

### (अ) काय करावे बरे ?

इयत्ता चौथीतील गुरप्रीतकौर या मुलीला ऐन उन्हाळ्यात भर दुपारी खो-खोचा सामना खेळायला जायचे आहे. तिला उन्हाचा त्रास होऊ नये यासाठी योग्य त्या सूचना द्यायच्या आहेत.

### (आ) विचार करा.

१. शेतात पीक उभे आहे. अशा वेळी दोन-तीन दिवस जोराचा पाऊस पडला तर शेतात पाणी साचून राहते. पीक सडून जाते. त्याचे कारण काय असेल ?

२. एखाद्या वर्षी पाऊस कमी पडतो, त्या वर्षी शेते का पिकत नाहीत ?

३. धामण हा एक सापाचा प्रकार आहे. तो शेताच्या आसपास का राहात असेल ?

४. बर्फ असणाऱ्या प्रदेशात अंगावर केस असणारे प्राणी राहात असतील, तर त्यांच्या अंगावर केस दाट असतील की विरळ ? त्याचे कारण काय असेल ?

### (इ) माहिती मिळवा.

१. महाराष्ट्रात पुढील ठिकाणे कोणत्या फळांसाठी प्रसिद्ध आहेत ?
(क) नागपूर (ख) घोलवड (ग) सासवड (घ) देवगड (च) जळगाव

२. या फळांची झाडे त्या विशिष्ट गावांच्या परिसरातच का वाढत असतील ? ही माहिती मिळवा आणि लिहून काढा. महाराष्ट्राच्या नकाशात ही गावे दाखवा. वर्गातील इतरांना ही माहिती सांगा.

### (ई) खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. वनस्पतींचा आपणांस कोणकोणता उपयोग होतो ?

२. वृक्षवासी प्राणी कोणाला म्हणतात ?

३. मार्च महिना सुरू झाला, की झाडांमध्ये काय बदल होतो ?

### (उ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

१. .......... संपला की पुन्हा थंडीचा मोसम येतो.

२. आपल्या काही ........... पूर्ण व्हाव्यात, म्हणून माणूस विविध प्राणी पाळतो.

३. वनस्पतींना कीड लागू नये म्हणून आपण ............ फवारतो.

४. हिवाळ्याचे वर्णन ............. ऋतू असेही करतात.

### उपक्रम

- ऋतुमानाप्रमाणे परिसरातील सजीवांमध्ये कोणते बदल दिसतात याचे निरीक्षण करा. नोंदी ठेवा.

***

## ३. मराठा सरदार – भोसल्यांचे कर्तबगार घराणे

टेस्ट सोडवा

**चित्र रेखाटनाचा प्रयत्न करा.**



शहाजीराजे

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे    वेब स्त्रोत-'ई-बालभारती'    सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in